अकोला महानगरपालिका, अकोला

विकास परवानगी आदेश

आरंभ प्रमाणपत्र

(Commencement Certificate)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये व मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३, २५४ बायत.

प्रकरण क्रमांक १४ / ३०५ /१२-१३
नगर नियोजन व विकास विभाग
दिनांक :- 3/१८/१२-

अका - 3
३४९० २३/33
२०१३

प्रति,

र.सालासर डेव्हलपर्स अकोला तर्फे ADP -अदरश
श्री. आशिष विमलचंद अग्रवाल व इतर
रा.राम नगर,
अकोला

कामाचे वर्णन

अकोला येथील मौजे अकोली बु. येथे सर्व साधारण शर्ती व अटीनुसार सोबतचे नकाशा प्रमाणे तळमजला + ४ चे निवासी वापराचे बांधकाम करण्यासाठी पुढील शर्तीस आधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

१. अकोला शहराच्या *मौजे अकोली बु.* येथील *सर्वे क्र.१४/३,मंजुर अभिन्यासातील भुखंड क्रं.१+२+३,*चे जागेवर सोबतच्या मंजुर नकाशानुसार बांधकाम करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.
२. सदर बांधकामास नकाशा प्रमाणे ओत्यापर्यंत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. नंतर सदर बांधकाम हे नियमानुसाणे व नकाशाप्रमाणे आहे असे प्रमाणपत्र दाखल करुन पुढील बांधकामास परवानगी घ्यावी.
३. मंजुर झालेल्या नकाशानुसार जागेचा विकास करण्यात यावा. त्यात या महानगरपालिकेची लेखी व स्पष्ट परवानगी शिवाय कोणताही बदल करु नये.
४. संदर्भित जागेच्याबर उल्लेखित्याप्रमाणे विकास करण्यास हा प्रमाणपत्रा अन्वये जी परवानगी देण्यात आली आहे. ती फक्त नगर रचनेच्या दृष्टीकोनातुन देण्यात आली आहे. सदर जागेवरील आयेदकाच्या मालकी हक्कास मंजुरी देण्यात आली असा या प्रमाणपत्राचा अर्थ नाही किंवा तसा हक्क या परवानगी आदेशामुळे प्राप्तही होऊ शकत नाही.
५. महानगरपालिकेच्या जागेवर किंवा कोणत्याही रस्त्यावर, गल्लीत, सरकारी जागेवर, नझुल जागेवर अथवा कोणाच्या खाजगी जागेवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करण्यात आल्यास या अतिक्रमणाची जबाबदारी अर्जदारावर राहील.
६. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर त्या इमारतीच्या उपयोगासाठी महानगरपालिकेची परवानगी मिळाल्याशिवाय सदर इमारतीचा वापर सुरु करु नये.
७. या प्रमाणे पत्रान्वये देण्यात आलेली परवानगी एक वर्षापर्यंतच अंमलात राहील.
८. इमारतीचे सांडपाणी अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या नालीस जोडावे अथवा स्वखर्चाने सोकपिट बांधावा.
९. भुकंप रोधक नियमाचे पालन करावे.
१०. बांधकाम पुर्ण झाल्यावर बांधकाम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्या शिवाय इमारतीचा वापर करु नये. अन्यथा बांधकाम पुर्ण झाल्यापासुन ३००/- रु. प्रतिदिन दंड आकारण्यात येईल.
११. छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन (रेनवॉटर हार्वेस्टिंग) करणे करिता उपाययोजना करणे आवश्यक राहील. इमारतीचा वापर सुरु करण्यापुर्वी रेनवॉटर हार्वेस्टिंगची तरतुद केल्याबाबत या कार्यालयास लेखी कळविणे अन्यथा सदर तरतुद आपण केल नसल्याचे गृहीत धरुन सदर परवानगी आदेश व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.
१२. बांधकामामध्ये फ्लाय ॲश विटा व फ्लाय ॲश आधारीत साहित्याचा वापर करणे बंधनकारक राहील.
१३. मालकी हक्काबाबत व जागेचे हद्दीबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार स्वत:जबाबदार राहील.
१४. विद्युत लाईन पासुन सुरक्षीत अंतर सोडुन बांधकाम करावे लागेल अन्यथा अपघात झाल्यास त्यास अर्जदार जबाबदार राहील.

कार्यालयीन प्रत ना. आयुक्त अमनदा यांचे स्वाक्षरीने मंजूर

दिनांक :- 3१/८/१२-

लिपीक

आयुक्त
अकोला महानगरपालिका, अकोला

प्रकरण क्र. १४/ ३०५ /१२-१३ अन्वये मंजुर झालेल्या नकाशाची प्रत आम्हाला मिळाली.

प्रतिलीपी,

कार्यपालक, महानगरपालिका, अकोला

अर्जदार/मालक/